# महात्मा फुले कृषि विद्यापीठ

राहुरी, जि. अहमदनगर - ४१३ ७२२

जा. क्र. विद्या-३/पदव्युत्तर/तळेगाव दाभाडे प्रवेश प्रक्रिया/२२५९/२०१८, दिनांक १८/१०/२०१८

प्रति,

**प्राचार्य,**
कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय,
तळेगाव दाभाडे, जि. पुणे.

विषय : **कृषि व्यवसाय व्यवस्थापन, महाविद्यालय, तळेगाव दाभाडे येथील सन २०१८-२०१९ प्रवेश प्रक्रिया राबविणेबाबत...**

संदर्भ : कृषि परिषद यांचे पत्र जा क्र. मकपि/शिक्षण-१/४६१८/२२९२, दिनांक ११ ऑक्टोबर, २०१८.

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या पदव्युत्तर कृषि व्यवस्थापन महाविद्यालय, तळेगाव दाभाडे, [पुणे] या महाविद्यालयात रिक्त पदे भरणेबाबतचा अहवाल सादर केल्याने महाराष्ट्र कृषि शिक्षण परिषद, पुणे यांनी त्यांचे संदर्भीय पत्र अन्वये विशेष बाब म्हणून सन २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षात पदव्युत्तर अभ्यासकमाच्या प्रवेश प्रक्रिया राबविणेबाबत मान्यता प्रदान केली आहे.

सदरची प्रवेश प्रक्रिया ही महाविद्यालय स्तरावर विद्यापीठाकडून नेमूण दिलेले निरिक्षकांच्या नियंत्रणात होईल. खाली दिलेल्या वेळापत्रकानुसार प्रवेश प्रक्रिया राबविण्यात यावी.

| अ. क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १ | **कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, तळेगाव दाभाडे, येथील पदव्युत्तर अभ्यासक्रमांर्गत रिक्त जागांकरिता महाविद्यालय स्तरावर जागेवरी प्रवेश फेरी** | |
| | **अ ] गुणवत्ता यादीमधील सबंधीत शाखेतील ६५ टक्के व त्यापेक्षा अधिक एकूण गुण असलेले उमेदवार** | **२२.१०.२०१८** |
| | **ब ] गुणवत्ता यादीमधील सबंधीत शाखेतील ५५ टक्के व त्यापेक्षा अधिक एकूण गुण असलेले सर्व पात्र उमेदवार [जागांच्या रूपांतरासह]** | **२३.१०.२०१८** |
| २ | **वर्ग सुरू होण्याचा दिनांक** | **२४.१०.२०१८** |

त्यानुसार सन २०१८-१९ शैक्षणिक वर्षाची प्रवेश प्रक्रिया पदव्युत्तर प्रवेश माहिती पुस्तिका २०१८ - २०१९ मधील नियमानुसार महाविद्यालय स्तरावर करण्यात यावी. महाविद्यालयात प्रवेश देण्याकरिता महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांचेद्वारे चालू शैक्षणिक वर्षात घेण्यात आलेल्या संबंधीत विद्याशाखेच्या सामाईक प्रवेश परीक्षेची गुण व अर्हता पदवीचे गुण यांचे प्रमाण ७०:३० असे राहील अशा प्रकारे एकूण किमान ५५ टक्के [१० बिंदू मापन किमान ५.५] गुण प्रवेशाकरिता अनिवार्य आहेत.

**[क.म.प]**

सन २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षातील अशा पात्र असलेल्या उमेदवारांची यादी मे. कल्प टेक्नॉलॉजी, प्रा. लि. पुणे यांचेकडून प्राप्त करावी. प्रवेश प्रक्रिया पूर्ण करून उमेदवाराचा प्रवर्ग, प्रवेश दिलेला प्रवर्ग, गुण, कोटा इत्यादी तपशीलाचा समावेश प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी [सॉफ्ट कॉपीसह] कृषि परिषद, पुणे व या कार्यालयास सादर करावी. उपरोक्त प्रवेश प्रक्रिया मे. कल्प टेक्नॉलॉजी, प्रा. लि. पुणे यांच्याकडून राबविण्यासाठी येणारा खर्च आपल्या महाविद्यालयाने करावयाचा आहे याची नोंद घेण्यात यावी.

प्रवेश प्रक्रियेबाबतची जाहिरात आपल्या स्तरावरून वर्तमान पत्रात प्रसिध्दीसाठी देण्यात यावी.

सोबत मान्यता दिलेल्या कोटा टेबलची प्रत जोडण्यात येत आहे.

**कुलसचिव**

प्रत : १. मा. संचालक शिक्षण, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांना माहितीस्तव सादर

२. मा. अधिष्ठाता [कृषि] तथा संचालक शिक्षण, मफुकृवि, राहुरी यांना माहितीस्तव सादर

३. मा. कुलगुरू यांचे स्विय सहाय्यक, मफुकृवि, राहुरी.

४. मे. कल्प टेक्नॉलॉजी, प्रा. लि. पुणे.

२/- यांना सुचित करण्यात येते की, सन २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षातील प्रवेशासाठीची अंतिम गुणवत्ता यादी [५.५ व त्यापेक्षा अधिक गुण असलेले] प्राचार्य कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, तळेगाव दाभाडे यांना उपलब्ध करून द्यावी.

५. सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, पुणे यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी.

सदर प्रवेश प्रक्रिया राबविण्यासाठी खालील निरिक्षकांची नेमणूक करण्यात येत आहे.

**१. डॉ. पी. एन शेंडगे, सहयोगी प्राध्यापक, कृषि अर्थशास्त्र विभाग, कृषि महाविद्यालय, पुणे.**
**२. श्री. सय्यद एस. ए., सहाय्यक कुलसचिव, कृषि महाविद्यालय, पुणे.**
**३. श्री. शरद गायके, अधिक्षक, विद्याशाखा, कृषि महाविद्यालय, पुणे.**

२/- यांना सुचित करण्यात येते की, यांनी पदव्युत्तर कृषि व्यवस्थापन महाविद्यालय येथील सन २०१८- २०१९ या शैक्षणिक वर्षाची जागेवरील प्रवेश प्रक्रिया आपले नियंत्रणाखाली राबवून तसा अहवाल कृषि परिषद, पुणे व या कार्यालयास सादर करावा.